Process Safety **Beacon**

http://www.aiche.org/CCPS/Publications/Beacon/index.aspx

उत्पादन क्षेत्रातील व्यक्तिंसाठी संदेश

**CCPS च्या समर्थकांकडून प्रायोजित**

# प्रतिकूल अर्थव्यवस्थेमध्ये सुरक्षा विसरू नका!

जून २००९







जवळपास प्रत्येक देशासाठी हा काळ आर्थिक मंदीचा आहे. विक्री आणि नफा यात घसरण झाली आहे आणि अनेक कंपन्यांना तोटा झाला आहे. कारखाने कमी क्षमतेवर चालू आहेत तर काही बंद पडले आहेत. जेंव्हा नफा कमी होतो तेव्हा साहजिकच कर्मचारी कपातीसह उत्पादन खर्च कमी करण्यावर भर दिला जातो. प्लँट वारंवार चालू व बंद करणे किंवा कमी क्षमतेवर चालवणे याचा परिणाम सुरक्षित कारभार व कामगारावरील वाढता तणाव यांवर होतो. कामगारावरील वाढता तणाव कामामधील असतर्कता व चुका होण्यास कारण होऊ शकतो. अशा तणावग्रस्त परिस्थितीत व्यवस्थापन आणि कामगार दोघांनीही सुरक्षा व प्रक्रीया सुरक्षा यांवर लक्ष केंद्रीत ठेवले पाहीजे. सुरक्षा आणि दूरगामी आर्थिक सुयश यासाठी आवश्यक असणारे प्रशिक्षण आणि प्रतिबंधात्मक देखभाल यात तडजोड केली जात नाही याची खात्री करा. कर्मचारी कपात करण्याची झाल्यास आपल्या कारखान्याच्या बदल व्यवस्थापन पद्धतीनुसार काळजापूर्वक करावा, आणि सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाच्या कामांच्या बाबतीत तडजोड केली जात नाही याची खात्री करा.

**अगदी आर्थिक मंदीच्या काळातही प्रक्रीया सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक खर्च चालू ठेवावेत...... कंपन्यांनी कारखाना, कामगार, कंत्राटदार आणि समाजाच्या सुरक्षेच्या दृष्टीने प्रत्येक निर्णय पारखून घ्यावा. शेवटी ज्या कंपन्या सुरक्षेमध्ये गुंतवणूक करीत राहतील त्याना पुढील भविष्यात त्याचे फायदे मिळत राहतील.**

**– – – जॉन ब्रेसलँड, अध्यक्ष, युनायटेड स्टेट्स केमिकल सेफ्टी आणि हझार्ड इन्व्हेस्टिगेशन बोर्ड**

## आपण काय करू शकता?

- आर्थिक मंदीच्या काळात सुरक्षा मूल्ये व प्रमाण यांवर सतत भर द्या. आपण कोणत्याही परिस्थितीत प्रक्रीयेतील सुरक्षितता साधली पाहीजे.
- आपल्या सुविधेतील कोणती कामे सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाची आहेत हे जाणून घ्या आणि आर्थिक तणावामुळे त्या कामांच्या बाबतीत तडजोड केली जात नाही याची खात्री करा.
- उत्पादन कमी असण्याच्या काळात सुरक्षाविषयक महत्वाची देखभालीची आणि बदलाची आणि सुधारणेची कामे करण्याच्या संधी विचारार्थ उपस्थित करा. मंदीचा काळ अशी कामे करण्यासाठी सुसंधी ठरू शकतो. बाजारपेठेतील मागणी कमी असते व प्लँट बंद असू शकतो किंवा कमी क्षमतेवर चालू असू शकतो.
- जर आपल्याला, खर्च कमी करण्याच्या उपायांमुळे सुरक्षेच्या दृष्टीने महत्वाची उपकरणे व कामांवर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे जाणवले तर व्यवस्थापनाला याची जाणीव असल्याची खात्री करा. सुरक्षेवरील संभाव्य दुष्परिणाम लक्षात न घेता फक्त खर्च ध्यानात ठेवून निर्णय घेतले गेले असू शकतात.
- बदल व्यवस्थापनाच्या पुनरावलोकनाचा वापर करून कर्मचारी बदलणे, उत्पादन खर्चातील कपात, कामकाजाच्या वेळापत्रकातील बदल आणि इतर खर्च कपातीसाठी होणारे संयंत्रातील बदल यांसारख्या बदलांमुळे होणाऱ्या दुष्परिणामांचा अभ्यास करा.

***अल्पकालीन आर्थिक त्रासामुळे सुरक्षेचे दीर्घ कालीन नुकसान होऊ देऊ नका!***

AIChE © 2008. सर्व हक्क राखीव. अव्यावसायिक, शैक्षणिक हेतूसाठी वापरण्यास प्रोत्साहन आहे. तथापि CCPS शिवाय अन्य कोणी पुनर्विक्री करण्यास सक्त मनाई आहे. संपर्क : ccps_beacon@aiche.org or २१२.५९१.७३१९

हे बीकॉन सहसा अफ्रीकन, अरेबिक, चिनी, डॅनिश, डच, इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, ग्रीक, गुजराती, हिब्रू, हिंदी, हंगेरियन, इंडोनेशियन, इटालियन, जपानी, कोरियन, मलाय, मराठी, नॉर्वेजियन, पर्शियन, पोर्तुगीज, रशियन, स्पॅनिश, स्वीडीश, तमिळ, थाई, तुर्की, आणि व्हीएतनामी इत्यादी भाषांमध्ये उपलब्ध आहे.

This Beacon is translated in Marathi by Mr. S.K. Gulawani, Maharashtra, India.